## प्रेसनोट

दिनांक ०८/०४/२०२१

**आरोपी अभिमन्यु धोंडीबा सुरवसे, वय ५१ वर्षे, पद सहायक अधीक्षक, वर्ग—३, नेमणुक जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर रा. नाथनगर, लातूर यांनी ८,०००/— रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचे आई व वडीलांचे उपाचाराचे ३,१२,५६४/—रुपयाचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाची तांत्रीक मंजूर करुन घेतो म्हणुन बीलाच्या ३ टक्के प्रमाणे शासकीय शुल्क ऑनलाईन भरावे लागेल. व शासकीय शुल्का व्यतिरीक्त बीलाच्या ५ टक्के प्रमाणे लाचेची मागणी करत असले बाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कडे दिनांक ०८/०४/२०२१ रोजी प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ०८/०४/२०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपीने तक्रारदार यांचे आई व वडीलांचे उपाचाराचे ३,१२,५६४/—रुपयाचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाची तांत्रीक मंजूर करुन घेतो म्हणुन बीलाच्या ३ टक्के प्रमाणे शासकीय शुल्क ऑनलाईन भरावे लागेल. व शासकीय शुल्का व्यतिरीक्त बीलाच्या ५ टक्के प्रमाणे लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ८,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ०८/०४/२०२१ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर येथील अभिलेखा विभागात तक्रादार यांना लाचेची रक्कम घेवुन पाठविले असता वरील नमूद आरोपी लोकसेवक यांनी ८,०००/— रुपये लाचेची रक्कम १६.२० वाजता पंचासमक्ष हाताच्या इशा—याने त्यांच्या कपाटमध्ये ठेवण्यास सांगुन स्वत: स्विकारली आहे. म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. लातूर येथे ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उपअधीक्षक बेद्रे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :— मोबाईलकमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :— मोबाईलकमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :— मोबाईलकमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :— मोबाईलकमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन कमांक | :— १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन कमांक | :— ०२४८२—२४२६७४ |
| ७) | Website | :— www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :— www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :— www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर